Exh. 35/C

रे. क. नं. ५/२०२६

# मे. दिवाणी न्यायाधिशसो क. स्तर कागल

## यांचे कोर्टात....

श्री सुनिल नारायण कांबळे —— वादी

विरूध्द

श्री. भिकाजी शिवाजी इंगळे —— प्रतिवादी

वगैर

**यातील प्रतिवादी नं. १ तर्फे वादी यांचे जैसे थे चे अर्जास लेखी म्हणणे पुढील प्रमाणे—**

order
--------
Seen&filed

१. प्रस्तुत वादी यांचा अर्ज साफ खोटा, चुकीचा, लबाडीचा व मे. कोर्टाची दिशाभूल करणारा असा असून तो प्रस्तुत प्रतिवादी नं. १ यांना मान्य नाही त्यातील एकुण एक मजकुराचा प्रस्तुत प्रतिवादी नं. १ स्पष्टपणे इन्कार करतात.

२. वादी यांनी ज्या स्वरुपामध्ये प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे त्या स्वरुपामध्ये तो कायदयातील तरतुदीप्रमाणे सकृत दर्शनी चालणेस अपात्र आहे. सबब त्याही कारणाने वादी यांचा जैसे थे चा अर्ज नामंजूर करणेत यावा.

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

३. वादी यांचे दावा व नि. ५ चे अर्जातील कलम १ व २ मधील वाद मिळकतीचे केलेले वर्णन हे अपुरे व वस्तुस्थिती विपर्यास्त असे आहे.

४. प्रस्तुत अर्जातील वादी यांनी जी प्रतिवादी नं. १ यांचे विरूध्द मागणी केलेली आहे तशी त्यांना मागणी कायदयाने मागता अगर देता येणारी अशी नाही.

५. प्रस्तुत प्रकारणी वादी यांनी नि. ५ चा कोणताही अमंल या कामी होणार नाही अशी साधारण भिती वादी यांना होत असलेने सदरचा अर्ज वादी यांनी दाखल केलेला आहे. हे वादी यांचे कथन साफ खोटे चुकीचे असे आहे. वादी यांनी मुळातच जी मागणी दाव्यामध्ये व नि. ५ चे अर्जामध्ये तसेच जैसे थे चे अर्जामध्ये मागणी केलेली आहे तशी मागणी कायदयाने त्यांना मागता येणे सारखी नाही तसेच प्रतिवादी नं. १ यांनी वादी यांचे मिळकतीमध्ये कधीही कोणत्याही प्रकारचे बांधकाम केलेले नाही त्या कारणाने देखील वादी यांना तशी मागणी मागता येणार नाही.

६. वादी यांचा सदरचा अर्ज हा बेकायदेशीर व चुकीचा असा असून वादी यांनी सदरचा मनाईचा दावा यातील प्रतिवादी नं. १ व इतर प्रतिवादी हे सदर दावा गट नं. ७१४ मध्ये असणारे सहहिस्सेदारांचे विरूध्द दाखल केलेला आहे. वास्तविकता सदर गट नं. ७१४ मध्ये अन्य सहहिस्सेदार असून सदर दावेत त्यांना पक्षकार म्हणून समाविष्ठ न केलेने सदर दावेस व मनाई अर्जास सी.पी.सी. ऑ १ रूल ९ चे तरतुदीची बाधा येत असलेने सदरचा मुळ दावाच चालणेसच पात्र नसलेने अशा स्वरूपाचा अर्ज देखील चालणेस पात्र नाही त्या कारणाने देखील तो नामंजूर करणेत यावा.

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

७. वादी यांनी दावा मिळकतीचे अपूरे वर्णन केले असल्याकारणाने दावा मिळकतीची स्पष्टचा दिसून येत नाही. त्यामुळे सदरचा दावा व नि. ५ व जैसे थे चा अर्ज चालविणेस सि.पी.सी ऑ. ७ रूल ३ ची बाधा येते त्याही कारणाने सदरचा अर्ज नामंजूर करणेत यावा.

८. प्रस्तुत कामी यातील वादी यांनी मुळ दावेचे कामी निव्वळ कायम मनाई सारखी मागणी केलेली असून प्रस्तुतचा दावा निव्वळ कायम मनाईचा असून त्यासोबत कोणतीही अनुषंगीक मालकीबाबत परिणामी दाद न मागितलेने सदर वादी यांचे मालकीबाबत साशंकता निर्माण होत असल्याने सदरचा अर्ज चालणेस पात्र नाही. त्याही कारणाने तो नामंजूर करणेत यावा.

९. सदर वादी यांनी त्यांचे मुळ दावा अर्जी कलम ४ मधील पान नं. ७ वर प्रस्तुत प्रतिवादी नं. ३ यांनी वादी यांचे क्षेत्रात कब्जा केलेचे मान्य व कबुल केले असून प्रतिवादी नं. १ यांनी कोणत्याही प्रकारचे वादी यांचे दावा मिळकतीमध्ये कोठेही कोणत्याही स्वरूपाचे अतिक्रमण केलेचे कथन केलेले नाही त्याही कारणाने वादी यांनी सदर अर्जाचे कामी प्रतिवादी नं. १ यांचे विरूध्द जशा दादीची मागणी केलेली आहे तशा दादी त्यांना मागता अगर देताही येणार नाही त्या कारणानाने देखील वादींचा अर्ज नामंजूर करावा.

१०. वादी यांचे मुळ दावा अर्जी कलम ३ मधील पान नं. ५ वर सदर वादी प्रतिवादी नंबर ३ व त्यांचा मुलगा म्हणजेच वादी यांचा पुतण्या व प्रतिवादी नं. १ यांनी तिघांनी मिळून सदरचे घर मोडकळीस आलेने सदरची घरे पाडून टाकलेली आहेत असे असता वादी यांनी प्रतिवादी

Asstt. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

नं. १ यांनी घर पाडून नवीन घर बांधकामासाठी मोठी रक्कम गुंतवून साहित्य देखील आणून बांधकाम करीत असताना त्यांना नाहक त्रास देण्याच्या हेतून व बांधकाम पूर्ण करू न देणेचे दृष्ट हेतून पक्षकार केलेले आहे. वादी यांचे दाव्याच्या चतु:सिमे मध्ये कोठेही प्रतिवादी नं. १ यांची मिळकत येत नसतानाही त्यांना नाहक त्रास व्हावा व त्यांचे आर्थिक नुकसान व्हावे या एकमात्र दृष्ट हेतून वादी यांनी प्रतिवादी नं. १ यांना जाणीवपूर्वक पक्षकार केलेले आहे.

११ सदर अर्जामध्ये कोणतेही सबळ व कायदेशीर कारण देखील दिलेले नाही. वादी यांनी ज्या स्वरूपात दावा या कोर्टात दाखल केला आहे तसा तो या कोर्टात चालणेस पात्र नाही. वादी यांना जर हददीच निश्चीत करावयाची होती तर त्यांनी भुमी अधिलेख यांचे कडे कायदेशीर मोजणी व हदद निश्चिती करीता अर्ज दाखल करून तशी माजणी करून घेणे कायदयाने अभिप्रेत असे आहे.

१२ प्रस्तुत कामी वादी यांना यशाची खात्री नसलेने वादी यांनी सदरचा अर्ज मे. कोर्टात दाखल करून मे कोर्टाची साहणुभुती मिळविण्याचा प्रयत्न करू पाहत आहेत त्याही कारणाने वादी यांचा अर्ज नामंजूर करावा. सदरचा अर्ज नामंजूर झालेस वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नसून या उलट सदरचा अर्ज मंजूर झालेस प्रतिवादी नं. १ यांचे घराचे बाधकाम थांबणार असून त्यांचे सिमेंट, वाळू, स्टील इ. साहित्यांचे खुप मोठया प्रमाणात नुकसान होणार आहे. तसेच वादी यांनी प्रतिवादी यांचे बांधकाम थांबविलेस बांधकाम कामगार यांचे देखील प्रतिवादी यांना नुकसानीपोटी

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

पगार भागविणे भाग पडणार असलेने प्रतिवादी नं. १ यांना खुप मोठा आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागणार आहे.

सबब, या व अन्य कारणांनाचा विचार करून वादी यांचा जैसे थे ठेवणेबाबतचा अर्ज खर्चासह नामंजूर करणेत यावा ही मे. कोर्टाना नम्र विनंती.

कागल

ता. ३०/०१/२०२६ प्रतिवादी नं १ तर्फे वकिल अर्जदार

## प्रतिज्ञा

प्रतिवादी नं. १ भिकाजी शिवाजी इंगळे व.व. धंदा – शेती रा.उदय नगर, कापशी ता. कागल जि. कोल्हापूर सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील म्हणणे मधील संपूर्ण मजकूर माझे माहिती व समजूती प्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केली सत्य प्रतिज्ञा आज मुा कागल ता. ३०/०१/२०२६

प्रतिवादी नं. १

Asstt. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

# ॲफिडेव्हिट

प्रतिवादी नं. १ भिकाजी शिवाजी इंगळे व.व. धंदा – शेती रा.उदय नगर, कापशी ता. कागल जि. कोल्हापूर शपतेवर कथन करतो की, वरील म्हणणे मधील संपूर्ण मजकूर माझे माहिती व समजूती प्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केले ॲफिडेव्हिट आज रोजी मुाा कागल दि. ३०/०१/२०२६

ॲफिडेव्हिट करणार
यांना मी ओळखतो.

भिकाजी शिवाजी इंगळे
ॲफिडेव्हिट करणार

VKhot (Adv. V. A. Khot)
ॲडव्होकेट

# प्रतिज्ञा

प्रतिवादी नं. १ भिकाजी शिवाजी इंगळे व.व. धंदा – शेती रा.उदय नगर, कापशी ता. कागल जि. कोल्हापूर शपतेवर कथन करते की, वरील म्हणणे मधील व ॲफिडेव्हिट मधील संपूर्ण मजकूर माझे माहिती व समजूती प्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केले प्रतिज्ञा आज रोजी मुाा कागल दि. ३०/०१/२०२६ इ रोजी.

भिकाजी शिवाजी इंगळे
प्रतिज्ञा करणार

Solemnly Affirmed before me by
Shri. Bhikaji Shivaji Ingle
Age. 60 of. Kapsi, Kagal who is
identified by Shri. V. A. Khot Adv
............whom I know personally
Dated :- 30/1/26

Assistant Superintend...

PRANITA SUHAS PATIL
Digitally signed by PRANITA SUHAS PATIL
Date: 2026.04.10 15:39:39 +0530